नि.दि.ख.क्र.– ११४/२०१५
गुलाम–वि– मोहम्मद अली
<u>निशाणी क्र.६५ च्या पुढे</u>

**<u>नांव</u> – गौरव गुलाबराव बावणकर,**

**<u>वादी साक्षीदार क्र.०१ यांचा अधिकचा सरतपास शपथेवर श्री. ठावरे वकीलांमार्फत.</u>**

२०. माझे पुराव्याचे शपथपत्र **<u>निशाणी क्र.६५</u>** मध्ये लिहिलेला मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहिण्यात आला असून तो वाचून–समजून मी त्यावर सही केली आहे.

२१. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/१** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे केलेल्या अर्जाची **सत्यप्रत** दाखल केली आहे. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य आहे. सदर दस्तास ओळखण्याकरीता निशाणी **आर्टिकल एस** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/२** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे केलेल्या अर्जाची **सत्यप्रत** दाखल केली आहे. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य आहे. सदर दस्तास ओळखण्याकरीता **<u>निशाणी आर्टिकल टी</u>** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/३** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे केलेल्या अर्जाची **सत्यप्रत** दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. सदर दस्तास **<u>निशाणी ९४</u>** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/४** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे दि. २९/०५/२०२३ रोजी केलेल्या अर्जाची **सत्यप्रत** दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. सदर दस्तास **<u>निशाणी ९५</u>** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/५** वरील दस्त दाखविण्यात आला. तो ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे ऑगस्ट – २०१५ च्या आवकजावक रजिस्टरची सत्यप्रत मिळण्याकरीता अर्ज केलाहोता. मागितली. **सत्यप्रत** दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य आहे. त्यावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. सदर दस्तास **<u>निशाणी आर्टिकल– यु</u>** देण्यात येतो.

२२. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/६** वरील दस्त दाखविण्यात आला. तो

ग्रामपंचायत नांदा गोमुख यांच्याकडे केलेल्या अर्जानुसार **सत्यप्रत** देण्यात आली. ती अभिलेखावर दाखल केली आहे. सदरचा दस्तावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.९६** देण्यात येतो. त्यामध्ये माझा अर्ज आवक क्रमांक २३६ दि.२२/०८/२०१५ मिळाल्याबाबत नोंद करण्यात आली आहे. तसेच जावक क्रमांक अनुक्रमांक ८११, ८१२, ८१३ बाबत नोंदी आहेत.

**२३.** आता मला दस्त यादी **निशाणी क्र.९३/७** वरील दस्त दाखविण्यात आला. भुमि अभिलेख कार्यालय, सावनेर यांच्याकडे नांदा गोमुख गावाचा नकाशा मिळण्याकरीता अर्ज दाखल केला होता. त्यानुसार मला गाव नकाशाची **प्रमाणीत प्रत** देण्यात आली होती. त्यामध्ये माझी जागा ह घर क्रमांक ६१५ च्या पश्चिमेस दाखवली आहे व माझ्या घराचा क्रमांक ६३१ असा नमूद करण्यात आला आहे. सदरचा दस्त हा पब्लीक डाकूमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.९७** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण**

**प्रतिवादी हजर व त्यांचे वकील श्री. कौटकर एस.डी.ओ. कार्यालयात व्यस्त असल्याने सहमतीने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**वा.दा.ब.अ.क.क.का.दा.**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**तिसरे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**
**समक्ष**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**तिसरे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**

दिनांक – १७/१०/२०२३

नि.दि.ख.क्र.– ११४/२०१५
गुलाम–वि– मोहम्मद अली
<u>निशाणी क्र.६५ च्या पुढे</u>

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- S. A. Misal